॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)
1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

KBCNMU/CDOE/22/12/2026 सौर,१७ भाद्र ,१९४८ शक संवत

Date : 08/09/2026

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
विद्यापीठाशी संलग्नित जळगाव,धुळे नंदुरबार
सर्व महाविद्यालये आणि परिसंस्था

**विषय : राज्यस्तरीय कार्यशाळेमध्ये पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबत....**

**महोदय / महोदया,**

आपणास कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव यांना दूरस्थ शिक्षण ब्युरो (DEB), युजीसी (UGC), नवी दिल्ली यांची दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (Centre for Distance and Online Education-CDOE) अंतर्गत एम. ए. इतिहास (History) आणि एम.ए. संरक्षण आणि सामरिकशास्त्र (Defence & Strategic Studies) हे दोन पदव्युत्तर (PG) शिक्षणक्रम सुरु करण्यासाठी ऑगस्ट 2026 मध्ये अधिकृत मान्यता मिळाली आहे.

दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची माहिती सर्वदूर व्हावी, समाजाशी विद्यापीठाचे नाते दृढ व्हावे, दूरशिक्षणाद्वारे उच्च शिक्षणापासून वंचित घटकांना सुवर्णसंधी उपलब्ध करून देणे यासाठी, तसेच बदलत्या शैक्षणिक व औद्योगिक गरजांचा विचार करून पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी आणि विविध क्षेत्रांतील कार्यरत व्यक्तींसाठी दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, कबचौउमवि.जळगाव या दोन्ही विभागाच्या संयुक्त विद्यमाने **"चार भिंतींच्या पलीकडचे शिक्षण: दूरस्थ शिक्षण पद्धतीद्वारे करिअर आणि उच्च शिक्षणाची वाटचाल"** (***Beyond Four Walls: Navigating Career & Higher Education Through Distance Mode***) या विषयावर दि. २८/०९/२०२६, सोमवार रोजी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**❖ कार्यशाळेची मुख्य उद्दिष्टे**

- दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांना करिअरच्या सर्वोत्तम संधींबाबत माहिती देणे.
- नोकरी करत असणाऱ्या व्यक्तींना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये 'कमवा आणि शिका' (Earn while you Learn) या बाबत मार्गदर्शन करणे.

**❖ कार्यशाळेची वैशिष्ट्ये**

आजच्या डिजिटल युगात आणि नवीन शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत शिक्षण केवळ पारंपरिक वर्गखोलीपुरते मर्यादित राहिलेले नाही. दूरस्थ शिक्षण पद्धती (Distance/Online Mode) द्वारे शिक्षण घेऊन नोकरी किंवा कौटुंबिक व्यवसाय सांभाळत उच्च शिक्षण कसे पूर्ण करावे, तसेच पदवी घेता घेता करिअरच्या सर्वोत्तम संधी कशा मिळवाव्यात, याचे थेट मार्गदर्शन या कार्यशाळेमध्ये दूरशिक्षणाच्या क्षेत्रांत कार्य करणारे नामांकित तज्ज्ञांद्वारे केले जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) मधील लवचिकता, तांत्रिक बदल आणि दूरस्थ शिक्षण क्षेत्रातील रोजगाराच्या सुवर्णसंधी विद्यार्थी व तरुणांपर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यापीठाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

सोबत कार्यशाळेचे सविस्तर माहिती पत्रक जोडले आहे. त्यानुसार आपणांस नम्र आवाहन आहे की, हे परिपत्रक आपल्या महाविद्यालयाच्या अधिकृत ग्रुपवर शेअर करावे. तसेच किमान 3 विद्यार्थी व 2 प्राध्यापकांना सहभागी होण्यासाठी नामनिर्देशित करावे ही विनंती. आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

कळावे,

डॉ.विनोद पाटील
कुलसचिव,
कबचौउमवि.जळगाव

Registrar
Kavayitri Bahinabai Chaudhari
North Maharashtra University,
Jalgaon - 425001 (M.S.)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव



## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

### आयोजित राज्यस्तरीय विशेष कार्यशाळा

**"चार भिंतींच्या पलीकडचे शिक्षण: दूरस्थ शिक्षण पद्धतीद्वारे करिअर आणि उच्च शिक्षणाची वाटचाल"**
**("Beyond Four Walls: Navigating Career & Higher Education Through Distance Mode")**

**दिनांक : 28/09/2026** **वार : सोमवार** **वेळ : सकाळी 10:00**

**स्थळ : डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम बिल्डींग सभागृह, कबचौउमवि,जळगाव**

## कार्यक्रम पत्रिका

| वेळ | सत्र (Session) | मुख्य विषय (Topic) | स्वरूप |
|---|---|---|---|
| 10:00 | स्टॉलचे उद्घाटन | महाराष्ट्रातील दूरशिक्षण केंद्रांद्वारे सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या माहितीच्या स्टॉल्सचे उद्घाटन | |
| 11:00 - 12:00 | कार्यशाळा उद्घाटन | प्रास्ताविक, स्वागत आणि मुख्य पाहुण्यांचे भाषण | |
| 12:00 - 01:00 | मार्गदर्शन सत्र 1 | कॉर्पोरेट क्षेत्रातील दूरस्थ शिक्षणाची स्वीकारार्हता आणि उद्योजकता विकास | तज्ज्ञांचे व्याख्यान आणि सादरीकरण |
| 01:00 - 01:45 | **दुपारच्या जेवणाची सुट्टी (Lunch Break)** | | |
| 02:00 - 03:00 | मार्गदर्शन सत्र 2 | कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक क्षेत्रातील कौशल्य वृद्धीसाठी दुहेरी पदवीचे महत्व | तज्ज्ञांचे व्याख्यान आणि सादरीकरण |
| 03:00 - 04:00 | समारोप सत्र | प्रश्नोत्तर तास आणि आभार प्रदर्शन | विद्यार्थ्यांशी थेट संवाद |
| 04:00 नंतर | **चहा आणि प्रमाणपत्र वाटप** | | |

## प्रमुख उपस्थिती

प्रा.व्ही.एल.माहेश्वरी
मा.कुलगुरू महोदय,
कबचौउमवि,जळगाव
**प्रेरणास्थान**

प्रा.एस.टी.इंगळे
मा.प्र-कुलगुरू महोदय,
कबचौउमवि,जळगाव
**प्रेरणास्थान**

डॉ.एम.एम. वावरे
मा.सहसचिव,
डेब,युजीसी, नवी दिल्ली
**उद्घाटक**

डॉ.विनोद पाटील
मा. कुलसचिव,
कबचौउमवि,जळगाव

सीए.रविंद्र पाटील
मा. वित्त व लेखाधिकारी,
कबचौउमवि,जळगाव
**मार्गदर्शक**

प्रा.मनिष जोशी
संचालक,
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,
कबचौउमवि.जळगाव

प्रा.समीर नारखेडे
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
कबचौउमवि.जळगाव
**संयोजक**

## ❖ विद्यापीठ परिचय

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University - KBCNMU) हे महाराष्ट्रातील जळगाव येथे स्थित एक प्रमुख सार्वजनिक राज्य विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना 15 **ऑगस्ट** 1990 रोजी झाली. सुरुवातीला हे 'उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' म्हणून ओळखले जात होते. परंतु, 2018 मध्ये राज्य सरकारने खान्देशच्या थोर लोककवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या सन्मानार्थ याचे नाव बदलून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' असे केले. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेद्वारे (NAAC) विद्यापीठाला 'अ' श्रेणी मिळाली आहे. उत्तर महाराष्ट्रातील खान्देश परिसरातील उच्च शिक्षणाचा विस्तार आणि गुणवत्ता दर्जा वाढवण्यासाठी या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांमध्ये पसरलेले असून जिल्ह्यांतील 200 पेक्षा जास्त कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy), विधी (Law) आणि शिक्षणशास्त्राची महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठाचा मुख्य परिसर सुमारे 660 एकरपेक्षा जास्त परिसरात पसरलेला आहे.

विद्यापीठाच्या मुख्य परिसरामध्ये विविध शाखांसाठी स्वतंत्र प्रशाळा (Schools) कार्यरत आहेत. मुला-मुलींसाठी अत्याधुनिक मध्यवर्ती ग्रंथालय (Central Library),स्वतंत्र वसतिगृहे, इनडोअर-आऊटडोअर क्रीडा संकुल आणि जिमखाना उपलब्ध आहे. विद्यापीठात बायो-गॅस प्रकल्प, सौर ऊर्जा संशोधन, कृषी-तंत्रज्ञान आणि स्थानिक वनस्पतींवर संशोधन यांसारख्या अनेक नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांवर काम केले जाते. परीक्षा पद्धती, निकाल आणि प्रशासकीय कामांसाठी ई-गव्हर्नन्स व डिजिटल प्रक्रियेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कामगिरीबाबत नावलौकिक मिळवणारे महाराष्ट्रातील अग्रेसर असलेले विद्यापीठ म्हणून ओळख आहे.

## ❖ दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र परिचय

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (महाराष्ट्र) यांना ऑगस्ट 2026 पासून 'दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र' (Centre for Distance and Online Education - CDOE) सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) / डिस्टन्स एज्युकेशन ब्युरो (DEB), नवी दिल्ली यांची अधिकृत मान्यता मिळाली आहे. दूरशिक्षण अंतर्गत सध्या एम. ए.इतिहास आणि एम.ए. संरक्षण आणि सामरिकशास्त्र हे दोन पदव्युत्तर (PG) शिक्षणक्रम सुरु आहेत.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा हा नाविन्यपूर्ण विभाग आहे. ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात जाऊन उच्च शिक्षण घेणे शक्य नाही, जे विद्यार्थी नोकरी - व्यवसाय करत आहेत, गृहिणी आहेत, स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत, तळागाळातील व्यक्ती ज्या शिक्षणापासून वंचित आहेत तसेच नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे शिक्षण अपूर्ण राहिले असेल अशा सर्वांना बाहेरून शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने उचललेले एक अभिनव पाऊल आहे.

## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची उद्दिष्टे

- दूरस्थ शिक्षण प्रणालीद्वारे ज्ञानाची निर्मिती, जतन आणि प्रसार करणे.
- जागतिक आणि स्थानिक कल लक्षात घेऊन विविध प्रकारचे शैक्षणिक कार्यक्रम उपलब्ध करून देणे.
- विविध वयोगटांतील अधिकाधिक अध्ययनार्थ्यांना त्यांच्या गरजांवर आधारित कार्यक्रम आणि सेवा पुरवणे.
- स्वयं-अध्ययन साहित्य, संपर्क सत्रे, समुपदेशन सुविधा, तसेच ग्रंथालय आणि इंटरनेट सुविधांसह विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे.
- लोकांचे जीवन समृद्ध करण्यासाठी निरंतर आणि आजीवन शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

## ❖ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग परिचय

विद्यापीठात 5 सप्टेंबर 2000 रोजी 'प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग' (Department of Adult & Continuing Education and Extension Services) स्थापन करण्यात आला. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 2016 नुसार, या विभागाचे नाव बदलून 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग' (Department of Lifelong Learning & Extension) असे करण्यात आले आहे. विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण, मूल्य शिक्षण आणि विस्तार उपक्रम यांच्याशी संबंधित कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे ही या मंडळाची मुख्य भूमिका आहे.

हा विभाग साक्षरता, कौशल्य विकास कार्यक्रम, गरजांवर आधारित अभ्यासक्रम आणि समुदाय विकास (तळागाळातील स्तरावर) यांसारखे उपक्रम राबवतो; यामध्ये विस्तार सेवा आणि संशोधन कार्यांचाही समावेश असतो. समाजाच्या सामाजिक-आर्थिक समस्या सोडवण्याबाबतची विद्यापीठाची जाणीवपूर्वक बांधिलकी आणि जबाबदारी, या विभागाद्वारे यशस्वीपणे आखल्या आणि राबवल्या जाणाऱ्या 'गरजांवर आधारित विस्तार कार्यक्रमां'मधून दिसून येते. समाजातील प्रत्येक वयोगटातील आणि स्तरातील व्यक्तीला आयुष्यभर शिकण्याची (Lifelong Learning) संधी उपलब्ध करून देणे हे या विभागाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

### आजीवन विभागाची मुख्य उद्दिष्टे

- **समाजाभिमुख शिक्षण** : उच्च शिक्षणाची गंगा महाविद्यालयाच्या चार भिंतींच्या पलीकडे नेऊन ग्रामीण, नोकरदार आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचवणे.
- **रोजगाराभिमुखता (Job-oriented Training)** : केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी लागणारी व्यावहारिक आणि व्यावसायिक कौशल्ये (Practical Skills) विकसित करणे.
- **अखंड अध्ययन (Lifelong Learning)** : वय, लिंग किंवा सामाजिक पार्श्वभूमीचा अडथळा न ठेवता वयाच्या कोणत्याही टप्प्यावर ज्ञान अद्ययावत करण्याची (Upskilling) तांत्रिक सोय उपलब्ध करून देणे.

## ❖ कार्यशाळेची मुख्य उद्दिष्टे

- दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांना करिअरच्या सर्वोत्तम संधींबाबत माहिती देणे.
- नोकरी करत असणाऱ्या व्यक्तींना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहित करणे.
- शिक्षकांना दूरस्थ आणि मुक्त शिक्षण पद्धतीचे (Distance & Open Education) बदलते स्वरूप, त्याचे महतत्व आणि त्यातील नवनवीन संधींची ओळख करून देणे.
- महाराष्ट्रातील दूरशिक्षण केंद्रांद्वारे सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या माहितीचे स्टॉल्स उपलब्ध करून विविध विषय निवडीचे पर्याय उपलब्ध करून देणे.

## ❖ कार्यशाळेची वैशिष्ट्ये

आजच्या डिजिटल युगात आणि नवीन शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत शिक्षण केवळ पारंपरिक वर्गखोलीपुरते मर्यादित राहिलेले नाही. दूरस्थ शिक्षण पद्धती (Distance Mode) द्वारे शिक्षण घेऊन नोकरी किंवा कौटुंबिक व्यवसाय सांभाळत उच्च शिक्षण कसे पूर्ण करावे, तसेच पदवी घेता घेता करिअरच्या सर्वोत्तम संधी कशा मिळवाव्यात, तसेच या कार्यशाळेमुळे शिक्षकांना स्वतःच्या व्यावसायिक प्रगतीसोबतच विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी मोठी मदत कशी करता येईल आणि शिक्षकांना केवळ एक 'मार्गदर्शक' न ठेवता, त्यांना आधुनिक युगाचे 'स्मार्ट एज्युकेटर' बनवण्यास मदत करेल, ज्याचा थेट फायदा त्यांच्या स्वतःच्या करिअरला आणि पर्यायाने विद्यार्थ्यांना होईल. या कार्यशाळेमध्ये दूरशिक्षणाच्या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या नामांकित तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) मधील लवचिकता, तांत्रिक बदल आणि दूरस्थ शिक्षण क्षेत्रातील रोजगाराच्या सुवर्णसंधी विद्यार्थी व तरुणांपर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यापीठाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

## ❖ कार्यशाळेसाठी प्रवेशाचे नियम आणि मर्यादा

- आपल्या महाविद्यालयातील **पदवी स्तरावर प्रवेशित किमान तीन (3) होतकरू विद्यार्थ्यांना** या कार्यशाळेसाठी पाठवावे.
- **विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क (Fees) नाही.**
- पहिल्या 200 **विद्यार्थ्यांनाच** प्राधान्याने **विनामूल्य** प्रवेश दिला जाईल.
- **प्राध्यापक/ शिक्षक व कार्यरत व्यक्तींसाठी :** शाळा / महाविद्यालयातील शिक्षक किंवा शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या कार्यरत व्यक्तींना नोकरी करता करता दूरस्थ शिक्षणाद्वारे स्वतःची शैक्षणिक पात्रता वाढवण्याची सुवर्णसंधी यातून मिळणार आहे. त्यांच्यासाठी केवळ 100/- **रुपये शुल्क** असून, अशा फक्त 100 **व्यक्तींनाच** प्रवेश दिला जाईल.
- **दुपारचे भोजन आणि चहा विद्यापीठाद्वारे दिले जाणार आहे.**
- या कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्वांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे.
- **कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे विद्यापीठाकडून दिले जाणार नाही.**
- आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची व प्राध्यापकांची नाव नोंदणी 15/09/2026 पूर्वी निश्चित करावी. त्यानंतर येणाऱ्या नावांचा समावेश केला जाणार नाही.
- विद्यार्थ्यांनी आपले आय-कार्ड (I-Card) सोबत येतांना आणावे. त्याशिवाय कार्यशाळेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.
- **कार्यशाळेच्या दिवशी ऐनवेळी कोणासही नाव नोंदणी करता येणार नाही.**

### नोंदणी शुल्क (Registration Fees)

- **शिक्षक आणि इतर:** ₹ 100
- **विद्यार्थी :** नि: शुल्क

### नोंदणी लिंक

| | |
|---|---|
| **पदवी स्तराच्या विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी लिंक** | https://forms.gle/75eiUo9ZASS9Dqi87 |
| **प्राध्यापक/ शिक्षक व इतर व्यक्तींसाठी नाव नोंदणी लिंक** | https://forms.easebuzz.in/register/North4Yq1V/Webinar_Seminar |

### अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी संपर्क


**समन्वयक : डॉ.मनिषा जगताप (सहा. प्राध्यापक) - 9850478669**

**सह-समन्वयक :**

**श्री. सुभाष पवार (वरिष्ठ सहाय्यक) - 9325405940**

**श्री. कल्पेश पाटील (मल्टीटास्क ऑपरेटर) - 7058587636**

**श्री. कुलदीप साळुंके (मल्टीटास्क ऑपरेटर) - 7058502585**

**श्री. तुषार गरुड (मल्टीटास्क ऑपरेटर) - 7709408987**

**कार्यालय :** 0257- 2258496 / 2257495